लोकमत शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५

# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

**मे. ग्रेटा एनर्जी लिमिटेड,** प्लॉट नं. बी-1 व एएम-1, म.औ.वि. मंडळ भद्रावती, जि. चंद्रपूर येथे त्यांच्या प्रस्तावित ग्रीनफील्ड प्रकल्पात पेलेट प्लांट (12,000,00 टन प्रति वर्ष), कोळसा गॅसिफिकेशन युनिट (सिन गॅस 62640 एनएम३/तास), सल्फर रिकव्हीर युनिट (2300 टन प्रति वर्ष), गॅस आधारित डीआरआय प्लांट (स्पाँज आयर्न-4,95,000 टन प्रति वर्ष), 65 टन - एलआरएफ आणि 65 टन - व्हीडी (बिल्ट्स - 4,22,950 टन प्रति वर्ष), रोलिंग मिल (टीएमटी रिबार्स आणि वायर रॉड्स - 4,00,000 टन प्रति वर्ष) आणि वीट उत्पादन युनिट (10,000 विटा प्रति दिवस) प्रकल्प उभारण्याच्या प्रकप्लाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याकरिता म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदर प्रकल्पामुळे भद्रावती तालुक्यातील तेलवासा, चारगांव, ढोरवासा, पिपरी, कोच्ची, घोनाड, चिरादेवी, गोरजा, किन्हाळा व यवतमाळ जिल्हात वणी तालुक्यातील पिंपळगांव, जुनाळा व उकणी ही गावे प्रभावित होणार आहेत. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्लीचे 14 सप्टेंबर, 2006 च्या अधिनियमान्वये व दि. 01 डिसेंबर, 2009 च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करण्याऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर नोंदविण्यात याव्यात.

**प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**उद्योग भवन, पहिला माळा, बस स्टॅण्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर-442401**
**फोन नं. 07172-251965**
**ईमेल : srochandrapur@mpcb.gov.in व rochandrapur@mpcb.gov.in**

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| **दिनांक** | : 28/05/2025 |
| **वेळ** | : सकाळी 11:00 वाजता. |
| **स्थळ** | : प्लॉट नं. बी-1 व एएम-1, म.औ.वि. मंडळ भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर |

**Webex Meeting link**
**https://mpcb.webex.com/mpcb/j.php?MTID=m4218a253efc0bb4f2cb38008f4fe4a8b**

| | |
|---|---|
| **वे.बॅक्स प मिटींग नंबर** | : 2518 949 7751 |
| **पासवर्ड** | : 28052025 |

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ति या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1) पर्यावरण विभाग, 15 वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रायल, मुंबई-400032
2) सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदुषण नियंकत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई-400022
3) प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, विसीए समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर
4) प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्‌योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर
5) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
6) जिल्हा परिषद, चंद्रपूर.
7) जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
8) उप-विभागीय कार्यालय, ता. चंद्रपूर, जि. चंद्रपूर.
9) तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
10) नगर परिषद कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
11) ग्रामपंचायत कार्यालय, चारगांव (तेलवासा व चारगांव), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
12) ग्रामपंचायत कार्यालय, ढोरवासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
13) ग्राम पंचायत कार्यालय, पिपरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
14) गट ग्राम पंचायत कार्यालय, घोनाड (कोच्ची व घोनाड), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
15) गट ग्राम पंचायत कार्यालय, चिरादेवी (चिरादेवी व गोरजा) ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
16) ग्राम पंचायत कार्यालय, किन्हाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
17) गट ग्राम पंचायत कार्यालय पिंपळगांव (पिंपळगांव व जुनाळा), ता. वणी, जि. यवतमाळ
18) ग्रामपंचायत कार्यालय, उकणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
19) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ - **www.mpcb.gov.in**

स्वा/-
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**